<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

## पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. ८

## ऑक्टोबर २०१०

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दि. ७ ऑक्टोबर २०१० रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

### प्रश्नोत्तरे

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

### स्थायी समितीचे ठराव

**<u>विषय क्र. २२०</u>**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूसंपादन/२४४ दि. ६/८/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. ५१०, दि. १४/८/२००९.
३) मनपा ठराव क्रं. ३१९, दि. २३/१२/२००९.
४) मनपा ठराव क्रं. ६१०, दि. २३/३/२०१०.

–––

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे महानगरपालिकेच्या मालकीचे पुणे पेठ शिवाजीनगर स.न.९७ गोखलेनगर येथील सावित्रीबाई फुले सभागृह भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी निविदा मागवल्या असता आलेल्या ६ निविदांपैकी अ.क्रं. १चे निविदाधारक अस्लम करीम मिरजकर,६४,जनवाडी ,पुणे.१६ यांची निविदा मनपा अपेक्षित रकमेपेक्षा सर्वात जास्त म्हणजेच मासिक भाडे र.रुपये २२,१२२/– इतकी असल्याने त्यांना पुणे पेठ शिवाजीनगर स.न.९७ गोखलेनगर येथील सावित्रीबाई फुले सभागृह क्षेत्रफळ ३३४.२० चौ.मी. बांधकाम ताबा दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी मासिक भाडे र.रुपये २२,१२२/– स्विकारुन भाडे तत्वावर चालविणेस देणेस, मासिक भाडे प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करणेस, याकरिता त्यांचेशी निविदा अटी शर्ती नुसार आवश्यक तो करारनामा करणेस तसेच मनपाचे येणारे अन्य शासकीय सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळच्या वेळी भरणेस व ताबा देणेपुर्वी ६ महिन्याचे मासिक भाडे रक्कम अनामत म्हणून व ३ महिन्याचे मासिक भाडे रक्कम आगाऊ स्विकारणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. १७५, दि. २३/८/२०१० चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. २२१</u>**

संदर्भ :– १) मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २४/८/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. ६५२, दि. २४/८/२००९.
३) मनपा ठराव क्र. ३९, दि. २४/५/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण (एस.आर.ए.) पुणे अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या गलिच्छ वस्ती घोषित झोपडपट्टीचे पुर्नवसन योजनेसाठी शासन निर्णय क्र. टीपीएस/१८०८/प्रक्र १२४२/०८/नवि–१३, नगरविकास विभाग–मुंबई यांचे दि. ११ डिसेंबर २००८ अन्वये जाहिर करण्यात आलेल्या झोपडपट्टीचे पुर्नवसन योजनेसाठी विशेष नियमावली तयार करण्यात आलेली आहे. सदर नियमावलीतील एस.आर.–९ अन्वये झोपडपट्टीचे पुर्नवसन योजना राबविताना जाहिर निविदा मागविण्याचे गरज नाही असा नियम मंजूर करण्यात आला आहे.

तथापि महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ६ मार्च २००८ आणि मा.सचिव, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचा शासन क्र. पीएमसी/३००५/२१९४/प्रक्र.१५७/०५/नवि–२२, दि. २१ फेब्रुवारी २००८ अन्वये व महानगरपालिकेच्या माहितीच्या मिळकती संदर्भात मे.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. १०२/२००१ दाखल करण्यात आलेली होती. त्या अन्वये मे.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेवून पुणे मनपाच्या

मालकीच्या मिळकती वाटप नियमावलीस पुणे मनपाच्या मा.मुख्य सभेने व मा.स्थायी समितीची मान्यता घेवून पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली – २००८ तयार करण्यात येवून त्यास महाराष्ट्र शासनाची अंतिम मान्यता घेण्यात आलेली आहे. या नियमावलीतील भाग–९ मधील अ.क्र. (१५)(१६)(१७), भाग–१० मधील क्र. २३ तसेच भाग–१२ मधील क्र. २६ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतींचा विनियोग जाहिर निविदा मागवूनच करण्यात येईल असे स्पष्ट आदेश देण्यात आलेले आहेत.

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतींवर ज्या गलिच्छ वस्ती घोषित झोपडपट्‌ट्या आहेत त्या झोपडपट्ट्यांचे त्याच जागेवर झोपडपट्टी पुर्नवसन योजना (एस.आर.ए.) राबविण्यासाठी जाहिर निविदा मागवून जास्तीत जास्त प्रिमियम रक्कम अदा करण्याची तयारी दर्शविणाऱ्या व्यक्ती/संस्था/संघटनांची शिफारस करुन त्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. १८५, दि. २५/८/२०१० चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. २२२</u>**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूमीप्रापण/१००९ दि. २२/३/२०१० चे पत्र.
२) मा.उज्ज्वल केसकर, मा.गणेश बिडकर, व मा.सौ.मेधा कुलकर्णी यांची दि.३०/३/२०१० ची उपसूचना.
३) स्थायी समिती ठराव क्रं. १८७३, दि. ३०/३/२०१०.

–––

मा. महा. आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहराच्या मान्य विकास आराखड्यामध्ये हाय कॅपॅसिटी मास ट्रान्सपोर्ट रोडसची आरक्षणे असून सदर आरक्षणे ही शहर विकसनाच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेवून त्याचा विकास होणे आवश्यक आहे. सदर आरक्षणामधील काही मिळकती तडजोडीने आणि अधिनियमातील तरतुदीनुसार पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या असून सद्य परिस्थितीत सदर मिळकतींना संलग्नता नसल्याने विकसित होणे अडचणीचे असून अशा मिळकती विकसित झाल्यास शहर वाहतुकीच्या दृष्टीने सुलभता येणार असून या आरक्षणामधील मिळकती भूसंपादन अधिनियम १८९४, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार ताब्यात घेण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

तसेच पुणे मनपाकडे ताब्यात घेणाऱ्या जागा तडजोडीने कोणत्या व भूसंपादनाने कोणत्या याचा संपूर्ण तपशील स्थायी समितीला सादर करुन माहिति देण्यात यावी.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. १७७, दि. २३/८/२०१० चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. २२३</u>**

संदर्भ :– १) मा.ॲड्.किशोर शिंदे व मा.बाबु वागसकर यांचे दि. १२/४/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ५४, दि. १३/४/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

महाराष्ट्र राज्याला ५० वर्षे पुर्ण होत असल्याने सन २०१० हे वर्ष सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. हा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यासाठी पुणेकर नागरिकांना महाराष्ट्राच्या कलेची ओळख व्हावी यासाठी एका सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन पुणे मनपाच्या वतीने करण्यास तसेच या महोत्सवासाठी अंदाजे र.रुपये पंचवीस लाख खर्च करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. १८३, दि. २३/८/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्रं. २२४**

संदर्भ :- १) मा. जिल्हाधिकारी यांचेकडील क्रं. पमह/कावि/१११८/१०,दि. ६/५/२०१० चे पत्र व क्रं. पमह/कावि/१११८/१०, दि. ६/५/२०१० चे पत्र.

२) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/भूसं/९६ दि. २८/५/२०१० चे पत्र.

३) स्थायी समिती ठराव क्र. २४८, दि. १/६/२०१०.

---

मा. अति. महा. आयुक्त (वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

मौजे वढू खुर्द गट नं.१४५ व मौजे तुळापूर गट नं.६४ ता.हवेली येथिल २५ हेक्टर सरकारी जागा रिन्युएबल एनर्जी जनरेशन या घनकचऱ्याच्या प्रकल्पासाठी ताब्यात घेण्याकरीता मा.जिल्हाधिकारी यांनी कळविलेली खरेदीची रक्कम शासनाकडे भरणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मौजे वढू खुर्द गट नं. १४५ येथे २५ हेक्टर व मौजे तुळापुर गट नं. ६४ येथील २५ हेक्टर क्षेत्र असलेल्या सरकारी जागा घनकचरा व्यवस्थापनासाठी रिन्युएबल एनर्जी जनरेशन प्रकल्पाकरीता पुणे मनपाकडे शासनाकडून ताब्यात घेणेस

२) घनकचरा व्यवस्थापन कार्यालयाकडील सन २०१०-२०११ चे अंदापत्रकातील बजेट तरतुदीनुसार मा. जिल्हाधिकारी यांनी कळविलेनुसार या दोन्ही जागाकरीता एकूण र.रू २,६३,२४,५१२/- (अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी त्रेसष्ट लक्ष, चोवीस हजार,पाचशे बारा फक्त) शासनाकडे अदा करणेस

३) वरील रक्कम प्रत्यक्ष भरतेवेळी त्यात बदल झाल्यास शासकीय नियमानुसार मा.जिल्हाधिकारी यांनी कळविलेनुसार रक्कम शासनाकडे अदा करणेस

४) विषयांकित दोन्ही जागा शासनाकडून पुणे मनपाकडे हस्तांतरीत झाल्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत या दोन्ही जागांवर रिन्यएबल जनरेशन प्रकल्प राबविणेसाठी घनकचरा व्यवस्थापन नियमावली २००० नुसार आवश्यक ती सर्व कामे पुणे मनपातर्फे करणेस

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.
(टिप :- सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. १९१, दि. २५/८/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्रं. २२५**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ/से/२३५ दि. २६/७/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ७२७, दि. ३/९/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे -

पुणे महानगर नियोजन समिती, पुणे समितीच्या कार्यालयास येणारा दैनंदिन खर्च, तांत्रिक व अतांत्रिक पदनिर्मिती यासाठी होणारा खर्च याबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) सन २०१०-११ या आर्थिक वर्षासाठी नियोजन समितीच्या दैनंदिन कामकाजासाठी येणारा खर्च करण्यासाठी, नियोजन समितीने सादर केलेल्या आर्थिक अनुदान मागणी प्रस्ताव शासनाकडून मान्य झाल्यानंतर त्याच्या ५०% रक्कम नियोजन समितीस देणेस

२) समितीने मागणी केलेल्या १५ तांत्रिक सेवकवर्गासाठी येणाऱ्या एकूण खर्च र.रुपये ४०,१५,८७२/- पैकी ५०% खर्च रुपये २०,०७,९३६/- नियोजन समितीस देणेस

३) वरील बाबींच्या अनुषंगाने येणारा खर्च त्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावरुन मा.मुख्य लेखापाल यांनी उपलब्ध करुन देणेस

४) समितीने मागणी केलेल्या १४ अतांत्रिक सेवकवर्गापैकी ७ अतांत्रिक (वरिष्ठ लेखनिक -१, कनिष्ठ लिपीक-२, शिपाई-३ व लघुलेखक-१) सेवक उपलब्ध करुन देणेस

**<u>विषय क्र. २२६</u>**

संदर्भ :- १) Office of the cantonment Board, Kirkee, Pune 03, No. 7/4/Octroi/P-23 Dtd. 27 Nov 2009 यांचे पत्र.

२) महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.पीएमसी/३००६/१८३२ /प्र.क्र.४८/०७/नवि–२२ मंत्रालय, मुंबई दि. ५/३/२००७.

३) सन २०००–२०१० या सालाकरीता करारनामा करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र. २४५ दि. १७/५/२००५ व मुख्य सभा ठराव क्र. १२० दि. २८/६/२००५ ची मान्यता व विषयपत्राची प्रत.

४) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आयातकर/२८० दि. १०/८/२०१० चे पत्र.

५) स्थायी समिती ठराव क्र. ७३७, दि. ३/९/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे व खडकी कॅन्टोंमेंट विभागास दि. १/४/२०१० ते ३१/३/२०२० या मुदतीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात प्रति वार्षिक आयातकर निव्वळ उत्पन्नाचा हिस्सा देण्याबाबतच्या करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) सन २०१० ते २०२० सालाकरीता खडकी कॅन्टोंमेंट व पुणे कॅन्टोंमेंट बोर्ड यांचेसमवेत दोन्ही बोर्डाच्या भुभागावर जकातकर उगवणीबाबत करारनामा करणेस

२) नविन करारनामा अस्तित्वात येईपर्यंत सन २०१०–२० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल २०१० पासून दोन्ही कॅन्टोंमेंट बोर्डास द्यावयाचा जकात हिस्सा, सन १९९० ते २००० या सालाकरीता झालेल्या करारनाम्यातील अट क्र. ४ व ४(अे) नुसार योग्य ते कर वजा करुन मा.मुख्य लेखापाल, पुणे मनपा विभागामार्फत तुर्त अदा करणेस

३) भविष्यात जकातकराची वसूली करणेसाठी अभिकर्त्याची नियुक्ती मनपामार्फत करणेत आल्यास खडकी कॅन्टोंमेंट व पुणे कॅन्टोंमेंट बोर्ड विभागास प्रति वार्षिक आयातकराचा हिस्सा मनपामार्फत देणेस

**<u>विषय क्र. २२७</u>**

संदर्भ :- १) मा.संचालक तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ४४९, एफअे, दि. ३१/८/२००७.

२) मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे महसूल शाखा क्र. कमह/कावि/७३८/०८ दि. ३/६/२००८.

३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/आशाद/२८५ दि. १०/८/२०१० चे पत्र.

४) स्थायी समिती ठराव क्र. ७३९, दि. ३/९/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

मे.सिटी कॉर्पोरेशन लिमिटेड, एफ.सी.रोड, पुणे ४ यांचेकडून ॲमानोरा पार्क टाऊनशिप, मौजे हडपसर येथील फायर स्टेशन चालविणेकरीता ताब्यात घेणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रातील नमूद अटी व शर्तीसह मे.सिटी कॉर्पोरेशन लिमिटेड, एफ.सी.रोड, पुणे ४ यांचेशी एमओयु करणेसाठी व त्या अनुषंगाने इतर कार्यवाही करणेसाठी व सदरचे फायर स्टेशन चालविणेसाठी आवश्यक ते कायमस्वरुपी मनुष्यबळ निर्माण करणेस व नेमणूक करणेस राज्य शासनाची मान्यता घेण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. २२८</u>**

संदर्भ :- १) मा.उज्ज्वल केसकर व मा.बाबुराव चांदेरे यांचे दि. १८/८/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ७५४, दि. ७/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

स. नं. ३५ बाणेर येथील गार्डनसाठी आरक्षित असलेली जागा मनपाच्या ताब्यात आलेली आहे सदर जागेवर उद्यान विकसित करणेसाठी र.रु.२५ लाखांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–११ चे अंदाजपत्रक, २.प्राथमिक शिक्षण, पान क्र. ११६, अ.क्र.४, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी एस–२३), पान क्र. २१५, अनु.क्र. ६८, कोथरुड स.नं. २५, १६६, १६७अ, १६८ब प्राथमिक शाळा बांधणे व प्लेग्राऊंड, इनडोअर गेम स्टेडियम करणे व पोहोण्याचा तलाव बांधणे. | २५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम –** | | |
| स.नं. ३५ बाणेर येथील गार्डनसाठी आरक्षित असलेली जागा मनपाच्या ताब्यात आलेली आहे सदर जागेवर उद्यान विकसित करणे | --- | २५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशांवर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रं. २२९**

संदर्भ :– १) मा.सौ.अलका खाडे यांचे दि. २५/६/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ४०९ दि. ८/७/२०१०.
३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्रं. मआ/विका क्र.२/२८९ दि. १६/८/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. ७५९, दि. ७/९/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वॉर्ड क्र.४ कळस विश्रांतवाडी येथील विश्रांतवाडी जाधववस्ती व इतर ठिकाणी रस्त्यात अडथळा ठरणारे विद्युत पोल शिफ्ट करणे व भूमिगत केबल टाकणेसाठी र.रु.१५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक,१० ग,विद्युत विभाग, पान क्र. १२८, अ.क्र. १०, शहरात विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र.एस–३), विद्युत विभागाकडील याद्या,पान नं.२०५,अ.क्र.८,वॉर्ड क्र.४ कळस गावठाण येथे व कळस विविध भागात एनर्जी सेव्हिंग दिवे बसविणे | ५ लाख | --- |
| पान नं.२०५,अ.क्र.९, वॉर्ड क्र.४ कळस,विशाल परिसर येथे व कळस विविध भागात एनर्जी सेव्हिंग दिवे बसविणे. | ५ लाख | --- |
| पान नं.२०५,अ.क्र.११,वॉर्ड क्र.४ कळस म्हस्केवस्ती येथे व कळस विविध भागात एनर्जी सेव्हिंग दिवे बसविणे | ५ लाख. | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र.४ कळस विश्रांतवाडी येथील विश्रांतवाडी जाधववस्ती व इतर ठिकाणी रस्त्यात अडथळा ठरणारे विद्युत पोल शिफ्ट करणे व भूमिगत केबल टाकणे | --- | १५ लाख |

**विषय क्रं. २३०**

संदर्भ :– १) मा.सौ.रत्नप्रभा जगताप व मा.भिमराव खरात यांचे दि. २३/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७७२, दि. ७/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.९७ मध्ये विविध ठिकाणी बोअरवेल्स करणेकामी र.रु.४ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, ७.रुग्णालये, प्रसुतिगृहे व औषधालये, पान क्र. ११८, अ.क्र.३, शहरात दवाखान्यामध्ये व रुग्णालयांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र.एस–२५), पान क्र.२१७,अ.क्र.१४ वॉर्ड क्र.९७ स.नं.६५ मधील दवाखाना सुरु करणे. (एकुण तरतुद ५० लाख) | ४ लाख | --- |

**नविन सुचविलेले काम**

| | | |
|---|---|---|
| वॉर्ड क्र.९७ मध्ये विविध ठिकाणी बोअरवेल्स करणे | --- | ४ लाख |

**<u>विषय क्रं. २३१</u>**

संदर्भ :- १) मा.सौ.रत्नप्रभा जगताप व मा.भिमराव खरात यांचे दि. २३/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७७३, दि. ७/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.९७ मधील आझादनगर रस्त्यालगत ४००मि.मि.व्यासाची एम.एस.नलिका टाकणेसाठी र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र. १०, शहरात निरनिराळया ठिकाणी रस्ते डांबरी करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी क्र.एस-२),पान क्र.१९६, अ.क्र.२६३ वॉर्ड क्र.९७ आझादनगर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. (एकुण तरतुद ३० लाख). | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. ९७ मधील आझादनगर रस्त्यालगत ४०० मि. मि. व्यासाची एम. एस. नलिका टाकणे. | --- | १० लाख |

**<u>विषय क्रं. २३२</u>**

संदर्भ :- १) मा.सौ.रत्नप्रभा जगताप व मा.भिमराव खरात यांचे दि. २३/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ७७४, दि. ७/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ९७ मधील एस. आर. पी. मैदान ते आझादनगरकडे जाणाऱ्या रस्त्यालगत ५०० मि. मि. व्यासाची एम. एस. नलिका टाकणेसाठी र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र. १०, शहरात निरनिराळया ठिकाणी रस्ते डांबरी करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी क्र.एस-२), पान क्र.१९६, अ.क्र.२६३ वॉर्ड क्र.९७ आझादनगर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. (एकुण तरतुद ३० लाख). | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. ९७ मधील एस. आर. पी. मैदान ते आझादनगरकडे जाणाऱ्या रस्त्यालगत ५०० मि. मि. व्यासाची एम. एस. नलिका टाकणे | --- | १० लाख |

**<u>विषय क्रं. २३३</u>**

संदर्भ :- १) कार्यकारी अभियंता(भवन) कार्यालय यांचे जा.क्र. १५५१ दि. २१/८/२०१० चे पत्र.
२) मा.सौ.रजनी त्रिभुवन यांचे दि. २३/८/२०१० चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र. ७७५, दि. ७/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ. क्र. ३८ मध्ये खालील कामेकरिता र.रु.३० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-११ चे अंदाजपत्रक २ प्राथमिक शिक्षण,पान क्र. ११६ , अ.क्र. ४, शहरात विविध ठिक़ाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, यादी क्र.एस २३, पान क्र. २१३ , अ.क्र. २०, वॉ. क्र. ३८ मध्ये संगमवाडी टी.पी.स्किम प्लॉट नं.१८८ या जागेवर इंग्लिश मिडियम प्रायमरी शाळा बांधणे. | ३० लाख | --- |
| **नविन सुचविलेले कामे –** | | |
| १) वॉ. क्र.३८ लोकसेवा वसाहतमध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीटीकरण करणे . | --- | १० लाख |
| २) वॉ. क्र. ३८ बाल मित्र मंडळा शेजारील झोपडपट्टीमध्ये ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीटीकरण करणे . | --- | ५ लाख |
| ३) वॉ. क्र. ३८ सिध्देश्वर झोपडपट्टीमध्ये गल्लीबोळ काँक्रीटीकरण करणे . | --- | ५ लाख |
| ४) वॉ. क्र. ३८ महात्मा फुले वसाहत मध्ये गल्लीबोळ काँक्रीटीकरण करणे | --- | १०लाख |

**विषय क्रं. २३४**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/नावियो/३०३, दि. २३/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८०३, दि. ७/९/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

अंदाजपत्रकातील मान्य तरतुदीमधून र.रुपये १ कोटीचे वर्गीकरण नागरवस्ती विकास योजना, सन २०१०-११, पुणे शहरातील झोपडपट्टीतील राहणाऱ्यांसाठी आरोग्य सहाय्य योजना मधील एफई१४डी१२०, र.रुपये ९ कोटी या खात्यातुन नागरवस्ती विकास योजना, युवक कल्याणकारी योजना मधील एफई१४डी१०१ या खात्याकडे वर्ग करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. २३५**

संदर्भ :- १) मा.विकास दांगट यांचे दि. २७/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८०९, दि. ७/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १३० वडगांव बु. मध्ये अंतर्गत ड्रेनेज लाईनच्या झालेल्या ठिकाणी चेंबर दुरुस्ती आणि रस्ते दुरुस्ती करणेसाठी र.रु.४० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. २८, अ.क्र. १, मुख्य मलनि:सारणी, मुख्य तपासकुंड (मॅनहोल्स), उपमुख्य मलनि:सारण नलिका, मलनि:सारणासंबंधी इतर कामे, स्थापत्य कामे, साधनसामुग्री, (अ) शहरातील मध्यवर्ती भागाच्या विकासासाठी (यादी क्र.एस-२६), ड्रेनेज लाईन टाकणे, | | |
| पान नं.५२, अ.क्र.११२ वॉर्ड क्र.१३० घुलेनगर धबाडी परिसर नाल्याचे कडेने ड्रेनेज लाईन टाकणे. | २० लाख | --- |
| पान नं.५२ अ.क्र.११४, वॉर्ड क्र.१३० घुलेनगर धबाडी परिसरात ड्रेनेज लाईन व कॉक्रीट टाकणे. | २० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. १३० वडगांव बु. मध्ये अंतर्गत ड्रेनेज लाईनच्या झालेल्या ठिकाणी चेंबर दुरुस्ती आणि रस्ते दुरुस्ती करणे. | --- | ४० लाख |

**विषय क्रं. २३६**

संदर्भ :- १) मा.बाळासाहेब बोडके व मा.बंडु गायकवाड यांचे दि. ३१/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८११, दि. ७/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –
वॉर्ड क्र.३६ मधील शिंदे पूल ते शिवाजी पूल जॉगिंग ट्रॅक करणेसाठी र.रु.१५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १३६, अ.क्र. १४, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे, (यादी एस २६), पान नं.२१९, अ.क्र.४१, वॉर्ड क्र.३६ शिक्षण मंडळ जुना तोफखाना जवळ महिला उद्योग केंद्र बांधणे. | १५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र.३६ मधील शिंदे पूल ते शिवाजी पूल जॉगिंग ट्रॅक करणे. | --- | १५ लाख |

**विषय क्रं. २३७**

संदर्भ :- १) मा.बाळासाहेब बोडके व मा.बंडु गायकवाड यांचे दि. ३१/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८१२, दि. ७/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ३६ शिवाजीनगर गावठाण येथील के.प्लॉट येथे विविध विकासाची कामे करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र.१३६, अ.क्र.८, शहरात विविध ठिकाणी व्यायाम शाळा बांधणे,(यादी एस १२),पान नं.२२२,अ.क्र.११ वॉर्ड क्र.३६ धोबीघाट येथे व्यायाम शाळा बांधणे. | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र.३६ शिवाजीनगर गावठाण येथील के.प्लॉट येथे विविध विकासाची कामे करणे. | --- | १० लाख |

**विषय क्रं. २३८**

संदर्भ :- १) मा.वसंत मोरे व मा.बाबु वागसकर यांचे दि. १३/५/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १९० दि. १९/५/२०१०.
३) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी क्रं. मआ/अनअ(पथ)/३२३ दि. २७/८/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. ८३३, दि. ७/९/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वॉर्ड क्र. १४१ कात्रज गांव मधील खडीकरण झालेले विविध रस्ते पेव्हरने डांबरीकरण करणे व उर्वरित रस्ते खडीकरण करणेकरिता र.रुपये २५.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र.२, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरी करणे, (यादी क्र.ए-२), पान क्र.१८१, अ.क्र. ४१, वॉर्ड क्र. १४१ कात्रज गुजरवाडी रस्ता कात्रज तलावालगत संरक्षण भिंत बांधणे | २५.५० लाख | --- |

<u>नविन सुचविलेले काम</u>

| | | |
|---|---|---|
| वॉर्ड क्र. १४१ कात्रज गांव मधील खडीकरण झालेले विविध रस्ते पेव्हरने डांबरीकरण करणे व उर्वरित रस्ते खडीकरण करणे | --- | २५.५० लाख |

<u>विषय क्रं. २३९</u>

संदर्भ :- १) मा.सौ.अलका खाडे यांचे दि. ११/५/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १७९ दि. १३/५/२०१०.
३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्रं. मआ/विका क्र.२/३३१ दि. ३०/८/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. ८३५, दि. ७/९/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वॉर्ड क्र. ४ कळस विश्रांतवाडी येथील विश्रांतवाडी स्मशानभुमीमध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १३६, अ.क्र.१४, भवन विभागातंर्गत विविध विकासाची कामे करणे, (यादी एस-२६), पा.क्र. २१८, अ.क्र.१, वॉर्ड क्र.४ मधील स.नं.११७,११८ मधील ३००० चौ.मी.शाळा, ५०० चौ.मी. पोस्ट ऑफिस, ५०० चौ.मी. पोलिस चौंकीसाठी,आरक्षित जागेला संरक्षण भिंत बांधून त्यावर मनपा पुणेचा फलक लावणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ४ कळस विश्रांतवाडी येथील स्मशानभुमीमध्ये विविध विकास कामे करणे | --- | १० लाख |

<u>विषय क्रं. २४०</u>

संदर्भ :- १) मा.राजाभाऊ बराटे व मा.शिवराम मेंगडे यांचे दि. ७/६/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ३१८ दि. २२/६/२०१०.
३) मा.उपायुक्त क्र.१ यांचे पत्र क्र. वाकक्षेक/१७४२ दि. १९/७/२०१० चे पत्र.
४) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्रं. मआ/भवन/३३४ दि. ३०/८/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
५) स्थायी समिती ठराव क्र. ८३६, दि. ७/९/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वॉर्ड क्र. ११२, स.नं. ११ कर्वेनगर येथील पोहोण्याच्या तलावास कमी पडणारी रक्कम पुरविणे या कामासाठी र.रु.१० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-११ चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने विकेंद्रीकरणातंर्गत करावयाची कामे, डीसीएनटी१०-११/३५, सीई २२ऐ६१४/व्ही ४-६९, वॉर्ड क्र. ११३ कॅनॉललगतच्या मोकळ्या जागेत ओटा मार्केट गाळे बांधणे. | १० लाख | --- |
| <u>नविन सुचविलेले काम –</u> | | |
| वॉर्ड क्र. ११२, स.नं. ११ कर्वेनगर येथील पोहोण्याच्या तलावास कमी पडणारी रक्कम पुरविणे. | --- | १० लाख |

**विषय क्रं. २४१**

संदर्भ :- १) मा.सुनिल गोगले, मा.शांतीलाल मिसाळ व मा.विशाल तांबे यांचे दि. १६/७/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ५२१ दि. २३/७/२०१०.
३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्रं. मआ/भवन/३५१ दि. २/९/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. ८३७, दि. ७/९/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वॉ.क्र. १६ फुलेनगरमधील अंतर्गत उद्यानातील विविध विकासाची कामे करणेकरिता र.रु. २५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १३६, अ.क्र.१४, भवन विभागातंर्गत विविध विकासाची कामे करणे, (यादी एस–२६), पा.क्र. २१८, अ.क्र.१४, वॉर्ड क्र. १६ (फुलेनगर) मुख्य आळंदी रस्त्यालगत असलेली मौजे येरवडा स.नं. १२०/१ शॉपिंग सेंटरसाठी आरक्षित असलेल्या जागेभोवती संरक्षक भिंत व तदनुषंगिक कामे करणे | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉ.क्र. १६ फुलेनगरमधील अंतर्गत उद्यानातील विविध विकासाची कामे करणे | --- | २५ लाख |

**विषय क्रं. २४२**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूमी जिंदगी/३४८ दि. ३१/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८५१, दि. ७/९/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे, पेठ नारायण ३४३, ३४७ वेलणकर शाळा भानुविलास सिनेमा येथील वाहनतळ ५ वर्षे ठेका पध्दतीने चालविणेस देणेबाबत निविदा मागविली असता आलेल्या एकूण ३ निविदांपैकी सर्वात जास्त दराची निविदा मे.कल्याणी एंटरप्रायझेस यांनी मनपा अपेक्षित रक्कम रुपये १,३३,६८१/– च्या तुलनेत रुपये ७०,८५०=९३ प्रति माह अशी सादर केलेली असल्याने त्यांचेकडून वार्षिक वाहनतळ शुल्क र.रुपये ८,५०,२१२/– स्विकारुन त्यांना चालविणेसाठी देणे व प्रतिवर्ष मूळ रकमेमध्ये २.५०% वाढ करुन वार्षिक मक्ता रकमेइतकी रक्कम ठेकेदाराकडून आगाऊ स्विकारुन ५ वर्षे मुदतीसाठी चालविणेस देणेप्रित्यर्थ त्यांचेशी जरुर तो करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. २४३**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/अनअ(वानि)/३५५ दि. ३/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ८५२, दि. ७/९/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

बिबवेवाडी स.नं. ६९२/६९३ सि.स.नं. २२०३ (पार्ट) डिसीजन टॉवर येथील वाहनतळ ५ वर्षे मुदतीसाठी निविदा पध्दतीने चालविणेस देणेबाबत निविदा मागविली असता ठेकेदार मे.आदित्य फिटनेस (श्री.अमोद बुचके) यांची एकमेव निविदा सादर झालेली असल्याने त्यांचेकडून र.रुपये २२,०००/– प्रति माह (मनपा अपेक्षित र.रुपये १५,९६९/– पेक्षा र.रुपये ६,०३१/– ने जास्त) या दराने व प्रती वर्षी २.५०% भाडेवाढ स्विकारुन ताबा दिनांकापासून ५ वर्षे मुदतीकरिता टेंडर अटी शर्तीनुसार चालविणेस देण्यास व त्या अनुषंगाने करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. २४४</u>**

संदर्भ :- १) मा.संतोष आरडे यांचे दि. ७/९/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ८८२, दि. ७/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

सिंगापूर येथे नुकत्याच झालेल्या युवा ऑलिंपिक क्रिडा स्पर्धेत ४०० मिटर अडथळ्याच्या शर्यतीत रौप्यपदक मिळवणारा पुण्याचा कुमार खेळाडू दुर्गेशकुमार पाल याची ही कामगिरी पुणे शहर व भारतीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.

त्याच्या या जागतिक स्तरावरील कामगिरीसाठी पुणे महानगरपालिके तर्फे र.रुपये १ लाखाचे आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

सदर अर्थसहाय्य हे सन २०१०-११ चे अंदाजपत्रक, १७.खेळ व क्रिडांगणे, पान क्र.७५, अ.क्र. २४, आंतरराष्ट्रीय गरजू खेळाडूंसाठी उत्तेजनार्थ आर्थिक सहाय्य या अर्थशिर्षकावर खर्ची टाकून देण्यात यावे.

**<u>विषय क्रं. २४५</u>**

संदर्भ :- १) मा.संतोष आरडे व मा.शंकर पवार यांचे दि. ७/९/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ८८३, दि. ७/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

नवी दिल्ली येथे कॉमन वेल्थ गेम होणार आहे. या स्पर्धेची बॅटन रिले पुणे शहरातून जाणार असून या बॅटन रिलेचे स्वागत मोठ्या प्रमाणावर करण्यासाठी र.रुपये १० लाख खर्च करण्यास तसेच त्यासाठी वर्गीकरणाने तरतुद उपलब्ध करुन देण्याचे अधिकार मा.महा.आयुक्त यांना देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशांवर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**<u>विषय क्रं. २४६</u>**

संदर्भ :- १) मा.वसंत मोरे यांचे दि. १४/६/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. ३५५, दि. २२/६/२०१०.

३) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी क्रं. मआ/उद्यान/३५८, दि. ६/९/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.

४) स्थायी समिती ठराव क्र. ८९१, दि. १४/९/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

वॉर्ड क्र.१४१ कात्रज तलावामध्ये शिवाजी महाराजाचा अश्वारुढ पुतळा बसविणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. १४६, अ.क्र. २, शहरातील विविध भाजी मंड्यामध्ये विकास कामे करणे, (यादी क्रं.एस-२९), पान क्र.२२६, अ.क्र.१७, वॉर्ड क्रं.१४१ येथे पुणे मनपाच्या जागेवरील पीएमटी बस स्टॉप येथे भाजी मंडई विकसित करणे. | १० लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम -</u>** | | |
| वॉर्ड क्र.१४१ कात्रज तलावामध्ये शिवाजी महाराजाचा अश्वारुढ पुतळा बसविणे. | --- | १० लाख |

**<u>विषय क्रं. २४७</u>**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूमीप्रापण/३५६ दि. ६/९/२०१० चे पत्र.

२) मा.सुनिल टिंगरे, मा.हनिफ शेख यांची दि. १४/९/२०१० ची उपसूचना.

३) स्थायी समिती ठराव क्र. ९३७, दि. १४/९/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे, पेठ हडपसर येथील रेल्वे क्रॉसिंगवरील उड्डाण पुलाकरीता २४ मी.डी.पी., २० मी.डी.पी. आणि १८ मी.डी.पी.रस्त्याचे भूसंपादनाविषयी, पुणे, पेठ खराडी येथील मुंढवा बायपास ते नगर रस्ता (व्हाया इन्फोटेक पार्क) दरम्यानचा आयआरडीपी रस्ता, मौजे वडगाव शेरी स.नं. ५,६,९,११,१३,१४ व १५ इ.मधून जाणारा ६० फूटी डी.पी.रस्ता, तसेच वडगांव शेरी स.नं. ७,८,१० इ.मधून जाणारा ८० फुटी डी.पी.रस्ता यांचा समावेश करुन घेण्यास, पुणे, पेठ कोंढवा खु. येथील स.नं. ३७, ३८ मधील २० मी.डी.पी. बायपास रस्ता त्वरीत संपादन करुन विकसित करणे आवश्यक असल्याने सदर मिळकतींचे महाराष्ट्र प्रांतिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार भूसंपादन करणे तसेच अर्जन्सी क्लौज अन्वये ताब्यात घेणे व सदरचे भूसंपादनासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. २४८</u>**

संदर्भ :– १) मा.सौ.उषा कळमकर व मा.सौ.नंदा कांबळे यांचे दि. ८/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९३९, दि. १४/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ. क्र. १० मध्ये खालील कामे करण्यासाठी र.रु.२० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–११ चे अंदाजपत्रक, १०.ख.वाहतुक नियंत्रण, पान क्र. १२६, अ.क्र. २३, शहरातील वाहतुक व्यवस्था सुधारणेसाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र.एस–३०), पान क्र.२०३,अ.क्र.३, वॉ.क्र.१० टाटा गार्ड रुम ( पुणे–नगर रोड चौकात उड्डाण पूल करणे.) | २० लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेली कामे –</u>** | | |
| १) वॉ. क्र. १० स.नं.४२ शिवशक्ती सोसायटी याठिकाणी भुमिगत विद्युत केबल टाकणे. | --- | ४ लाख |
| २) वॉ. क्र. १० साईनाथ सोसायटी व जयहिंद सोसायटी याठिकाणी भूमिगत विद्युत केबल टाकणे. | --- | ५ लाख |
| ३) वॉ.क्र.१० स.नं.४३,४७ व ३८ याठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी स्टेज बांधणे. | --- | ५ लाख |
| ४) वॉ.क्र.१० मध्ये विविध ठिकाणी इंटर लॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | ६ लाख |

**<u>विषय क्रं. २४९</u>**

संदर्भ :– १) मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता यांचे दि. १३/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९४१, दि. १४/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉ. क्र. ११६ मध्ये पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट येथे विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधणे करिता र.रु.२३.५० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–११ चे अंदाजपत्रक, १२. भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, | | |
| १) पान क्र. १३६, अ.क्र. ११, शहरात विविध ठिक़ाणी समाज मंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी क्र.एस १६), पान क्र. २२३, अ.क्र. ९, वॉ. क्र. ११६ मध्ये पर्वती चाळ क्र.१०८ पूरग्रस्त वसाहतीमध्ये समाज मंदिर बांधणे. | ८.५० लाख | --- |
| २) पान क्र. १३६, अ.क्र. ११, शहरात विविध ठिक़ाणी समाज मंदिर, | | |

| | | |
|---|---|---|
| ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी क्र.एस १६), पान क्र. २२४, अ.क्र.४१, वॉ. क्र. ११६ चाळ क्र.१०८ पर्वती दर्शन समोरील समाज मंदिराचे उर्वरित काम करणे. | १० लाख | --- |
| ३) पान क्र. १३६, अ.क्र. १४, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. २६), पान क्र.२२०, अ.क्र.१०१, वॉ. क्र. ११६ पर्वती दर्शन नालाकडील सुरक्षा भिंत बांधणे | ५ लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम –</u>** | | |
| वॉ. क्र. ११६ मध्ये पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट येथे विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधणे. | --- | २३.५० लाख |

**<u>विषय क्रं. २५०</u>**

संदर्भ :- १) मा.बाबु वागसकर व मा.संतोष आरडे यांचे दि. १४/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९४२, दि. १४/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

महात्मा गांधी उद्यान याठिकाणी असणारा वाहनतळ श्री.गणेश पांडुरंग शिंदे यांना वार्षिक भाडेपट्ट्याने देण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी श्री.गणेश पांडुरंग शिंदे हे गेली १० वर्षे वाहनतळ चालवित आहेत. त्यांची मुदत मार्च २०११ अखेर संपत आहे.

तरी सदर वाहनतळ श्री.गणेश पांडुरंग शिंदे यांना जुन्या दराच्या भाड्यामध्ये १०% वाढ करुन पुढील ५ वर्षासाठी चालविणेस देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. २५१</u>**

संदर्भ :- १) मा.अरुण धिमधिमे व मा.संतोष आरडे यांचे दि. १४/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९४३, दि. १४/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

बँकॉक येथील दुसऱ्या एशियन योगा चॅम्पियनशिप ७ व ८ सप्टेंबर २०१० ला झालेल्या योगा स्पर्धेत कु.आश्रफ पठाण, राहणार पानमळा झोपडपट्टी, सिंहगड रोड, पुणे याने तीन सुवर्ण पदके मिळविलेली असून त्याची ही कामगिरी भारताची व पुणे शहराच्या नाव लौकीकात भर घालणारी असून त्याच्या या कामगिरीचा पुणे शहराला अभिमान आहे.

कु.आश्रफ पठाण हा झोपडपट्टीत पत्र्याच्या घरात राहत आहे. त्याच्या घरची परिस्थिती अत्यंत गरीब आहे. त्याने केलेल्या कामगिरीबद्दल त्याला पुणे मनपातर्फे र.रुपये एक लाख आर्थिक मदत देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. २५२</u>**

संदर्भ :- १) मा.ॲड्.निलेश निकम, सभागृह नेता, मा.उज्ज्वल केसकर, मा.बाबु वागसकर, मा.सौ.मेधा कुलकर्णी, मा.विजय देशमुख, मा.संतोष आरडे, मा.सौ.आशाबी नदाफ, मा.हनिफ शेख, मा.बंडु गायकवाड यांचे दि. १४/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९४४, दि. १४/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालितील अधिकारी सेवकांना तसेच उच्च माध्यमिक व तांत्रिक शाळांमधील शिक्षकेतर सेवकांना सहाव्या वेतन आयोगापोटी दि.१.७.२००९ ते ३१.१२.२००९ अखेरचा फरक अदा करणेसाठी र.रु. ५० कोटीचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| <u>अर्थशिर्षक</u> | <u>कमी</u> | <u>अधिक</u> |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, पान क्र. १०४, अ.क्र. २५, आरई३५ अे १०१, २५. नविन वेतनश्रेणीनुसार दयावयाचे वेतन | ५० कोटी | --- |

<u>नविन सुचविलेले काम</u>

| | | |
|---|---|---|
| पुणे महानगरपालितील अधिकारी सेवकांना तसेच उच्च माध्यमिक व तांत्रिक शाळांमधील शिक्षकेतर सेवकांना सहाव्या वेतन आयोगापोटी दि.१.७.२००९ ते ३१.१२.२००९ अखेरचा फरक अदा करणे. | --- | ५० कोटी |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशांवर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

<u>विषय क्रं. २५३</u>

संदर्भ :- १) मा.शांतीलाल मिसाळ व मा.शैलेंद्र नलावडे यांचे दि. १३/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९५३, दि. २१/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वार्ड क्रं. ८६, लोहियानगर व्यायामशाळेत व्यायाम साहित्य पुरविणेकरीता र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| <u>अर्थशिर्षक</u> | <u>कमी</u> | <u>अधिक</u> |
|---|---|---|
| सन २०१०-११ चे अंदाजपत्रक, १० ग विद्युत विभाग, पान क्र. १२८, अ.क्र. १०, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र.एस-३), पान क्र. २०९, अ.क्र. १७४, वॉड क्रं. ८६, मनपा वसाहत क्रं.८ येथे विद्युत वायरिंग बदलणे व प्रकाश व्यवस्था करणे. | १० लाख | --- |
| <u>नविन सुचविलेले काम</u> | | |
| वार्ड क्रं. ८६, लोहियानगर व्यायामशाळेत व्यायाम साहित्य पुरविणे. | --- | १० लाख |

<u>विषय क्रं. २५४</u>

संदर्भ :- १) मा.शांतीलाल मिसाळ व मा.शैलेंद्र नलावडे यांचे दि. १३/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९५४, दि. २१/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वार्ड क्रं. ८६, लोहियानगर येथील मुस्लीम कब्रस्थान येथे विविध विकासाची कामे करणेकरीता र.रुपये १८ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| <u>अर्थशिर्षक</u> | <u>कमी</u> | <u>अधिक</u> |
|---|---|---|
| सन २०१०-११ चे अंदाजपत्रक, १० ग विद्युत विभाग, पान क्र. १२८, अ.क्रं. १०, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र.एस-३), पान क्र. २०८,अ.क्र. १६६,१६७,१६८ | | |
| १) वॉर्ड क्र. ८६, येथील धोकादायक पोल काढणे अंडरग्राऊंड वायरिंग करणे. | ३ लाख | --- |
| २) वॉर्ड क्रं.८६, येथील ८ व ९ नंबर कॉलनी येथे धोकादायक पोल काढणे अंडरग्राऊंड वायरिंग करणे. | ५ लाख | --- |
| ३) वॉर्ड क्रं.८६, येथील चाँदतारा चौक, घोरपडी पेठ, गफुरतकीया येथे धोकादायक पोल काढणे अंडरग्राऊंड वायरिंग करणे. | १० लाख | --- |
| <u>नविन सुचविलेले काम</u> | | |
| वार्ड क्रं. ८६, लोहियानगर येथील मुस्लीम कब्रस्थान येथे विविध विकासाची कामे करणे. | --- | १८ लाख |

<u>विषय क्रं. २५५</u>

संदर्भ :- १) मा.विरेंद्र किराड व मा.अजित आपटे यांचे दि. १३/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९५६, दि. २१/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र.७८ स्वामी समर्थ मंदिर येथील बुरडी पूल ते बाबा आढाव पुल ( कै.रोहिदास किराड दवाखाना) समोरील नाल्याची सिमा भिंतीची उंची वाढविणे व तदनुषंगिक कामे करणेसाठी र.रु.१० लाखाचे

खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १३६, अ.क्र. ११, शहरात विविध ठिकाणी समाज मंदिर ,ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी क्रं.एस १६), पान क्र.२२३, अ.क्र.२८, वॉर्ड क्र.७८ मध्ये समाज मंदिर बांधणे. (एकुण तरतुद १५ लाख) | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र.७८ स्वामी समर्थ मंदिर येथील बुरडी पूल ते बाबा आढाव पुल (कै.रोहिदास किराडा दावाखाना) समोरील नाल्याची सिमा भिंतीची उंची वाढविणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | १० लाख. |

**विषय क्रं. २५६**

संदर्भ :- १) मा.विरेंद्र किराड व मा.अजित आपटे यांचे दि. १३/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९५७, दि. २१/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र.७८ स्वामी समर्थ मंदिर येथे येथे खालील कामे करणेसाठी र.रु.३८ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १६. उद्याने, प्राणी संग्रहालये, पान क्र. १४०, अ.क्र. २९, शहरातील विविध उद्यानामध्ये विकास कामे करणे,(यादी क्रं.एस २७), पान क्र.२२८, अ.क्र.४९ वॉर्ड क्र. ७८ श्री स्वामी समर्थ मंदिर विविध ठिकाणी असणारे ऐतिहासिक हौद (खाजगीसह) दुरुस्त करणे व कारंजे बसविणे (एकुण तरतुद ५० लाख) | ३८ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| १) वॉर्ड क्र.७८ स्वामी समर्थ मंदिर येथील सांस्कृतिक हॉल,अभ्यासिका व उद्यान मध्ये विद्युत व स्थापत्य विषयक कामे करणे. | --- | २५ लाख. |
| २) वॉर्ड क्र.७८ श्री स्वामी समर्थ मंदिर येथील श्री स्वामी समर्थ बालोद्यान येथील सांस्कृतिक हॉल व अभ्यासिका साठी विविध विकासाची कामे करणे. | --- | १३ लाख |

**विषय क्रं. २५७**

संदर्भ :- १) मा.बापुसाहेब पठारे, आमदार व मा.भिमराव खरात यांचे दि. १३/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९५८, दि. २१/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र.८ मध्ये खालील कामांसाठी र.रु.७५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, सन २०१०-११ चे अंदाजपत्रक, १० ग विद्युत विभाग, पान क्र. १२८, अ.क्रं. १०, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र.एस-३), पान नं.२०५, अ.क्र.१५, वॉर्ड क्र.८ लाईट पोल काढुन अंडरग्राउंड करणे. | ७५ लाख. | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| १)वॉर्ड क्र.८ मधील विविध ठिकाणी अर्धवट असलेल्या ड्रेनेज लाईन व रस्ते डांबरीकरण करणे. | --- | १५ लाख |
| २) वॉर्ड क्र.८ खराडी गावठाण येथील सांस्कृतिक भवनाचे उर्वरित काम पूर्ण करणे. | --- | २० लाख |

| | | |
|---|---|---|
| ३) वॉर्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे. | --- | १० लाख |
| ४) वॉर्ड क्र.८ स.नं.५० पुणे मनपाच्या ताब्यात आलेल्या गार्डनमध्ये विरंगुळा केंद्र बांधणे. | --- | १५ लाख |
| ५) वॉर्ड क्र.८ स.नं.५० पुणे मनपाच्या ताब्यात आलेल्या गार्डनमध्ये ग्रंथालय व अभ्यासिका बांधणे. | --- | १५ लाख |

**<u>विषय क्रं. २५८</u>**

संदर्भ :- १) मा.सौ.सुमन पठारे व मा.बंडु गायकवाड यांचे दि. १३/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९५९, दि. २१/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.९ मध्ये खालील कामे करण्यासाठी र.रु.७५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १० ग विद्युत विभाग, पान क्र. १२८, अ.क्रं. १०, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र.एस-३), पान क्र. २०५, अ. क्र. १६, वॉ. क्र. ९ परिसरातील धोकादायक लाईट पोल काढून अंडरग्राऊंड केबल टाकणे | ७५ लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम –</u>** | | |
| १) वॉ. क्र. ९ शुक्रेवस्ती बोराटेवस्ती,खराडकर पार्क व परिसरामध्ये अर्धवट ड्रेनेज लाईन पूर्ण करणे व रस्ते डांबरीकरण करणे . | --- | २० लाख |
| २) वॉ. क्र. ९ शुक्रेवस्ती , बोराटेवस्ती , तुकाराम नगर,यशवंतनगर व विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे . | --- | १५ लाख |
| ३) वॉ. क्र. ९ काळूबाई नगर व विविध ठिकाणी गल्लीबोळ कॉंक्रीट करणे, इंटर लॉकींग ब्लॉक बसविणे . | --- | १० लाख |
| ४) वॉ. क्र. ९ थिटे वस्ती व विविध ठिकाणी गल्लीबोळ कॉंक्रीट करणे, इंटर लॉकींग ब्लॉक बसविणे . | --- | १० लाख. |
| ५) वॉ. क्र. ९ विडी कामगार वसाहत येथील व्यायमशाळेचे वरच्या मजल्याचे काम करणे . | --- | १० लाख |
| ६) वॉ. क्र. ९ खराडी गावठाण येथे ग्रंथालय व अभ्यासिका बांधणे | --- | १० लाख |

**<u>विषय क्रं. २५९</u>**

संदर्भ :- १) मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. १४/९/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९६१, दि. २१/९/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १ धानोरी गावठाण पाण्याची टाकी ते लक्ष्मीनगर पर्यंत १८ इंची पाण्याची लाईन टाकणेसाठी र. रु. ४० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
प्रकरणी मे. शासनामार्फत दि. १६/७/०९ अन्वये एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७ (१ ए ए ) अन्वये पुणे म.न.पा.च्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये पार्किंग व्यवस्थेबाबतचे नियम नव्याने समाविष्ट करणेबाबत निर्देश दिले आहेत. तथापि, नियोजित मॉडीफिकेशन नं. ६ अन्वये दर्शविलेले पार्किंगबाबतचे नियम फक्त पार्किंग स्पेस (कार पार्किंगबाबत) नमूद आहेत. तथापि, पुणे शहराकरीता सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नसले कारणाने स्वतंत्रपणे स्कूटर,सायकल, कारपार्किंग याबाबत नियमामध्ये उल्लेख असणे आवश्यक आहे. तसेच मे. शासन निर्णयामध्ये नमूद पार्किंग सद्यस्थितीतील पुणे शहरातील कार, दुचाकी वाहने यांची संख्या पाहता अपूरी आहे असे वाटते.सबब यापूर्वीचे हरकती सूचनांचा विचार करुन केलेले पार्किंग बाबतचे बदल पुणे म.न.पा. चे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करणे योग्य होईल तसेच गावठाणातील दाट वस्तीतील मिळकतींना जुन्या नियमाप्रमाणे पार्किंगचे नियम लागू करण्यात यावेत. तसेच कन्झेस्टेड एरियामध्ये पूर्वीच्या पार्कींग नियमामध्ये पार्किंग शक्य होत नसेल त्यांचेकडून पार्कींग बद्दल प्रीमीयम रक्कम आकारून ती रक्कम ठरविण्याचा अधिकार व त्यांना सवलत देण्याचे अधिकार मा.महा.आयुक्त यांना देण्यात येत आहे.

यापूर्वीचे हरकती सुचनांचा विचार करुन केलेले पार्किंगबाबतचे बदल पुणे म.न.पा.चे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करणेबाबतची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये गौण फेरफाराची कार्यवाही पूर्ण झाली असल्याने मे. शासनाची अंतिम मान्यता घेणेकरीता मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. १३२, दि. २३/८/२०१० चा झाला आहे.)

<u>विषय क्र. २७९</u>

संदर्भ :– १) मे.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे टीपीएस २५०७/अनौ२७/ प्र.क्र.५२/२००८/नवि ३०, दि. १४/१०/०८ अन्वयेचे निर्देश
२) मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/१२०६, दि.१३/१/२००९ चे पत्र.
३) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.२७३, दि. २९/३/२०१०

विषय :– पुणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये मंजूर विकास योजनेतील सार्वजनिक निमसार्वजनिक विभागातील क्षेत्रावर काही अटीवर वाणिज्य वापर अनुज्ञेय करणेबाबत. एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वयेची कार्यवाही करणेबाबत.

– – –

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

राज्यातील सर्व महानगरपालिका /" अ " वर्ग नगर यांच्या विकास नियंत्रण नियमावलीत विकास

योजनेतील सार्वजिक निमसार्वजनिक विभागात वाणिज्य अनुज्ञेय करण्याची तरतुद समाविष्ट करणे तसेच त्यांच्यात एकसुत्रता आणणे याकरिता मंजूर विकास योजनेतील सार्वजनिक निमसार्वजनिक विभागातील क्षेत्रावर काही अटीवर वाणिज्य वापर अनुज्ञेय करणेबाबत खालीलप्रमाणे शेडयुल समाविष्ट करण्यासाठी मे. शासनाने टीपीएस २५०७/अनौ २७/प्र.क्र.५२/२००८/नवि ३०, दि.१४/१०/०८ अन्वये कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

तरी खालीलप्रमाणे सदरची तरतूद डी.सी.नियमामध्ये समाविष्ट करणेसाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७ ( १ ) अन्वये गौण फेरफाराची कार्यवाही करणे आवश्यक आहे. या कार्यवाहीचा भाग म्हणून दैनिक वर्तमानपत्र व शासकीय राजपत्रात जाहिर प्रकटन देऊन नागरिकांच्या हरकती व सूचना मागविण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

SCHEDULE

( Accompaniment to order No.TPS-2507/UOR-27/CR-52/2008/UP-30 dated – 14th October, 2008 )

| Area of Plot | Permissible Commercial use in Percentage |
|---|---|
| Upto 1000 sq.mt. | 7.5% |
| 1001 to 2500 sq.mt. | 10% |
| 2501 to 4000 sq.mt. | 12% |
| 4001 & above | 15% |

Commercial use shall be allowed on following condotions-

| | |
|---|---|
| I) | Convenient Shopping, branch of bank, small hotels etc. shall be permitted but shops/hotels for wine, pan, cigarette, tobacco, lottery tickets and such others which do not serve public purpose similarly domestic gas shops / godowns which are dangerous to public health shall not be permitted. |
| II) | The income from such a commercial uses shall be utillised for main users for which the development has taken place o would taken place or would take place. |
| III) | Such a commercial development shall take place in such a way that it shall not affect the view of the main development on the land, similarly such a commercial user shall be permitted up to 50% length of the plot. |
| IV) | The Planning Authority shall ascertain that for parking places and for traffic, sufficient area is kept in the plot. |
| V) | Additional F.S.I.shall be allowed only on the plot area remained after deducting the plot area utilised for commercial user. |
| VI) | The Planning Authority shall not allow sub division of Survey No. Gut No, Plot No. on which such a development which may cause/has take place/would take place. |
| VII) | (1) In such layouts or sub-divisions having area more than 2 ha. But less than 5 ha. 20% land for public utilities and amenities like electric sub-station, bus station, sub post office, police out post, garden, playground, school, dispensary and such other amenities shall be provided. |
| VIII) | The commercial user is permitted upto a depth of 12.00 mt. |
| IX) | The land owner/developer/institution shall give gurantee in writing to the Planning Authority for following all the stipulated conditions scrupulously. |
| X) | The plots in which there is an existing development, such commercial use shall be restricted to max.20% of the balance potential. |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. १३३, दि. २३/८/२०१० चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. २८०</u>**

संदर्भ :– १) मा. महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/नअ/११२, दि. २/६/२०१० चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३७, दि.११/६/२०१०.

---

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपाकडून विविध कारणामुंळे जागा संपादन करताना माहे एप्रिल २०१० मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी. डी. आर. च्या माहितीची नोंद घेवून मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टी.डी. आर. झोन | क्षे.चौ.मी. | डी.आर. सी. क्र | डी.आर.सी. दिल्याचा दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोंढवा खुर्द,स.नं. ११/२ बी +३, ११/२ बी +३/१, ११/२ बी +३/३, ११/२ बी +३/४, ११/२ बी +३/५, | प्ले ग्राऊंड १ | अझम फकीरभाई पानसरे | सी | ३६००.०० | ३८६९ | १३.४.२०१० |
| २ | हडपसर,स.नं.१६१, हि.नं.१९ बी | १२ मी.डी.पी. रस्ता | श्री.उत्तम एन.बनकर व इतर | सी. | ८०.०० | ३८६५ | १५.४.२०१० |
| ३ | कात्रज स.नं.१० पैकी | एस.आर. ए. | जयंत शहा जयराज डेव्हलपर्स युनीट ३ | सी. | ९९५५.४९ | ३८७२ | १९.४.२०१० |
| ४ | घोरपडी स.नं. ७०अे/५/१ | ॲमिनिटी स्पेस | १) उमाकांत आर. गोरडे २) सोमनाथ उर्फ विलास आर.गोरडे ३) शशिकला एस.निंबाळकर ४) वसुदा उर्फ दमयंती टाकळकर ५) शोभना एस.काकडे ६) रजनी व्ही. शेडगे ७) बीनदू पी.शेटे ८) विजया वाय गोरडे ९) आनंद वाय गोरडे १०) अनुरधा वाय गोरडे ( पीएएच) रविराज देविकेश कन्स्ट्रक्शन तर्फे १) रविंद्र एर्न संकला २) शैलेश आर.शहा ३) देविचंद एम.जैन | बी | २४५४.९२५ | ३८८५ | २१.४.२०१० |
| ५ | कसबा पेठ,सि.टी. एस.नं.८९२ ब | एस.आर. ए. | मे.क्यूबा प्रापर्टीज शेख मोहमद | ए | १९७.३४ | ३८६४ | २२.४.२०१० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | फिरदौस शब्बी | | | | |
| ६ | भवानी पेठ स.नं. ५२७ कासेवाडी | एस.आर. ए. | मे.सौभाग्यलक्ष्मी डेव्हलपर्स | ए | ५५२७.३६ | ३८७६ | २२.४.२०१० |
| ७ | घोरपडे पेठ सि.टी.एस. नं.३३८/अे/३ | एस.आर. ए. | मे.आर.के.असो .रियाज इस्माईल सय्यद | ए | ७२७.८४ | ३८७१ | २६.४.२०१० |
| ८ | नानापेठ सि.टी.एस.नं. १०४६ ते १०५४ | एस.आर. ए. | ईश्वर कन्स्ट्रक्शन प्रा.लि.मॅनेजिंग डायरेक्टर श्री.ईश्वर सी.परमार | ए | ५२५३.४६ | ३८८७ ते ३८९६ | २७.४.२०१० |
| ९ | हडपसर स.नं.१०६ अे/१७ अे | 20 m . D.P & EWS | अनिल गोगावले (पीएएच) श्री.अशोक बा.टाके व इतर | सी | २६५३.४६ | ३८६६ | २८.४.२०१० |
| १० | भवानी पेठ सि.टी. एस.नं.७८६ + ७८७ | एस.आर. ए. | अमू डेव्हलपर्स ॲन्ड प्रमोटर्स श्री.केतन जयंतीलाल विरा. | ए | २६८०.०० | ३८८६ | २९.४.२०१० |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. २०२, दि. २५/८/२०१० चा झाला आहे.)

<u>विषय क्र. २८१</u>

संदर्भ :– १) महाराष्ट्र शासनाचे सुधारीत निर्देश क्र. TPB ४३०२/८१८/ce–८८/२००२/UD–११ दि.१७/०३/२००३ व नोटीफिकेशन TPB १८०७/१७३०/CR–८५०/०७/UD–१३ १४/०९/२००७.

२) शासनाचे आदेश क्र. TPB/४३०९/४१९/CR-२२/०९/UD-११ दि.२७/०२/०९.

३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नगरअभि /१६७, दि. २६/६/२००९ चे पत्र.

४) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३८, दि.११/६/२०१०.

–––

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

बायोटेक्नोलॉजी पार्क म्हणजेच जैव तंत्रज्ञानाचा संबंध वनस्पती, प्राणी आणि सुक्ष्म जीव यासह सजीव प्रणालीशी येतो. जीवनास आधार देणाऱ्या जैविक प्रक्रिया पासून जैव तंत्रज्ञानास बळ प्राप्त होते. सजीव सेंद्रीय किंवा त्याचा भाग आणि इन्झाइन्स प्रोटीन्स, जी नैसर्गिक रित्या उपलब्ध आहेत अथवा सजीव प्रणालीतून काढून त्याचा वापर होतो अशा कोणत्याही पध्दतीचा अंतर्भाव या तंत्रज्ञानात होतो. अशा पध्दतीचा उपयोग हा उत्पादनासाठी किंवा उत्पादनात बदल करण्यासाठी वनस्पती किंवा प्राणी यांची उत्पादन क्षमता विकसित करण्यासाठी तसेच विशेष प्रयोजनासाठी सूक्ष्म सेंद्रिय विकसित करण्यासाठी होतो. उदयास येणाऱ्या जैव तंत्रज्ञानात एकत्रित डी.एन.ए. सेल फ्युजन व एब्रिया मॅन्युप्युलेशन यांचा वापर होतो. कृषि, संवर्धन, आरोग्य, पर्यावरण संरक्षण वगैरे व्दारे जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी परिणामकारक रित्या बदलण्याची क्षमता जैव तंत्रज्ञानात आहे. जैव तंत्रज्ञानातील काही क्षेत्रात केवळ भारतातच नव्हे जागतिक स्तरावर आघाडी घेण्याची क्षमता निर्माण होणे करिता महाराष्ट्राचे जैव तंत्रज्ञान धोरण जाहिर केले आहे.

संदर्भ क्र. १ अन्वये, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ महाराष्ट्र जैव तंत्रज्ञान धोरणाच्या अनुषंगाने करावयाच्या विकास नियंत्रण नियमावलीत कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत सुधारित निर्देश क्र. टीपीबी – ४३०२/८१८/प्र.क्र.८८/२००२/नवि –११, दि.१७/०३/२००३ चे दिलेले होते. तद्नंतर त्या अनुषंगाने एम.आर.टी.पी. १९६६ मधील कलम ३७ (२) अन्वये पत्र क्र. टीपीबी –

१८०७/७३०/सीआर–८५०/०७/युडी–१३, दि.१४/०९/२००७ ने नोटीफिक्रेशन असून त्यामध्ये पब्लिक बॉडीज् उदा. म्हाडा सीब्झ्, सिकॉम, सिडको इ. ने स्थापन केलेल्या जैवतंत्रज्ञान युनिटस् करिता प्लॉट समोरील रस्ता १२.० मी. पेक्षा जास्त असावा. तसेच या युनिटस्करिता अतिरिक्त १०० टक्के एफएस.आय.प्रस्तावित केलेला असून, ५० टक्के प्रिमियम शासनास देणेत यावा असे अधिसूचित केले आहे. सोबत सदर नोटिफिकेशनची प्रत जोडली आहे.

आता संदर्भ क्र. २ अन्वये शासनाचे आदेश क्र. TPB/4309/419/CR-22/09/UD-11 दि.२७/०२/०९ ने खाजगी Biotechnology Park ना आय.टी. पार्कच्या धर्तीवर अतिरिक्त एफएस.आय. देणेसंदर्भांत एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम १५४ अन्वये पुढील आदेश दिलेले असून उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे कळविले आहे.

**DIRECTIONS**

1. The said Authorities shall initiate modification to their respective Regulation as detailed out in schedule appended hereto\
2. The said Authorities shall publish the requisite notice inviting suggestions/objections over the said modification within a period of 90 days from the date of issue of this order.
3. After completing the legal procedure, as laid down under section 37(1) of the said Act, the said modification proposal shall be submitted to the Government for final sanction.
4. Pending sanction to these modifications by the Government under section 37 (2) of the said Act, the aforementioned modifications shall come into effect forthwith.
5. This direction will supercede earlier Government directives vide order no. TPB 4302/818/CR-88/2002/UD-11 dated 10th October, 2002, 17th March, 2003 and the existing provision in this regard in the Development Control Regulation of any Planning Authority.

(Accompaniment to Urban Development Departments Order No. TPB 4309/419/CR – 22/09/UD – 11 dated 27th February, 2009.)

| Modification No. | Subject | Version of modification |
|---|---|---|
| 1 | Definitions | The Biotechnology Units/Parks shall mean Biotechnology units/parks which are certified by the Development Commissioner (Industries) or any officer authorized by him in his behalf. The biotechnology park and unit/units outside park shall have minimum land area of 2 acres or 20000 sq.ft. built up area. The said requirement of 20000 sq. ft. shall be as per normal permissible FSI and without considering permissible additional FSI/TDR/Free of FSI area. |
| 2 | Biotechnology Units/Park to be allowed in Service Industries Zone (I-1) | 'Biotechnology Units/Park shall be permitted in I-1 Zone and Services Industrial Estates on all plots fronting on roads having width more than 12 metre"' |
| 3 | Biotechnology Units/Park to be allowed in General Industries Zone (I-2) and Special Industrial Zone (I-3) | "Biotechnology Units/Park shall be permitted on all plots fronting on roads having width more than 12 meter." |

| | | |
|---|---|---|
| 4 | Biotechnology Units/Park to be allowed in No Development Zone/Green Zone earmarked in the Development Plan. | I) Biotechnology units/parks shall be permitted in No Development Zone/Green Zone subject to following conditions :-<br>(i) Maximum FSI limit shall be 0.20 and as far as possible the development shall be at one place of the total land.<br>(ii) The ground coverage shall not exceed 10% of the area of plot.<br>(iii) Tree plantation shall be done at the rate of 500 Trees/Ha. On the remaining land excluding the built up area and the surrounding open space/utility space.<br>(iv) The maximum height of buildings shall not exceed 24 mt.<br>(v) Essential residential development for the staff/officer's accommodation shall be permitted upto the extent of 33% of the permissible built up area.<br>(vi) These users shall be permitted in No Development Zone, within a distance of 3 km. from the adjoining developable zone.<br>(vii) Development in plots affected by CRZ area, shall be permissible subject to the notification issued by MOEF regarding CRZ. |
| 5 | Additional FSI to Biotechnology Units/Park | Subject to approval by Director of Industries, the Commissioner/ Chief Officer or as the case may permit the floor spaces indices specified in these regulations to be exceeded to the extent of 100% over and above the permissible FSI (including for Biotechnology Units/Park located in NDZ / Green Zone/Agriculture Zone proposed in the Development Plan) for biotechnology units/parks subject to following conditions :<br>i) Out of total built up area minimum 90% shall be used for Biotechnology purpose and maximum 10% (by deducting parking spaces) shall be used for ancillary users such as specified in the Govt. Resolution of Industry, Energy and Labour Deptt. No. BTP 2008 /CR-1608/Ind-2, dated 10/2/09<br>ii) Additional FSI to Biotechnology units would be available to Biotechnology Parks duly approved by the Directorate of Industries and after observance of all the regulation of environment.<br>iii) Parking spaces, as per the provision of Development Control Regulation shall be provided subject to minimum requirement of the one parking space per 100 sq. mt. builtup area.<br>iv) The additional FSI shall be granted upon payment of premium which shall be paid in the manner as may be determined by the Government. Such premium shall be recovered at the rate of 25% of the present day market value of the land under reference as indicated in the Ready Reckoner.<br>v) 25% the total premium shall be paid to the Govt. and remaining 75% amount shall be paid to the said Authority.<br>vi) The premium so collected by the Planning Authorities shall be primarily used for development/upgradation of off site infrastructure required for the Biotechnology Parks.<br>vii) In the event, the developer comes forward |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | for provision of such off site infrastructure at his own cost, then the said Planning Authority shall determine the estimated cost of the works and shall also prescribe the standards for the work. After completion of the works the said Planning Authority shall verify as to whether the same is as per prescribed standards and thereafter, by deducting the cost of works, the balance amount of premium shall be recovered by the said Planning Authority. |
| | | viii) | No condonation in the required open spaces, parking and other requirement prescribed in the regulations shall be allowed in case of additional FSI. |
| | | ix) | Development of biotechnology park shall be done as per the guidelines issued by Industries. Department vide the said resolution. |

सदरची तरतूद डी.सी.नियमामध्ये समाविष्ट करणेसाठी विकास नियंत्रण नियमालीमध्ये एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये गौण फेरफाराची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

या कार्यवाहीचा भाग म्हणून दैनिक वर्तमान पत्र व शासकीय राजपत्रात जाहिर प्रकटन देऊन नागरिकांच्या हरकती व सुचना मागविण्यासाठी मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. २०३, दि. २५/८/२०१० चा झाला आहे.)

<u>विषय क्र. २८२</u>

संदर्भ :– १) मा. उपसचिव,नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.टीपीएस/३००५/९८७/ प्रक्र.१९४/२००५/नवि–३०, दि. १५/४/२००६.

२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२०, दि. २५/८/२००६.

३) मा.मुख्य सभा ठराव क्र. ३९७, दि.७/१२/२००६.

४) मा.महा.आयुक्त मआ/न.अ./५४, दि. २९/४/२०१० चे पत्र.

५) मा.सुभाष जगताप, मा. दत्तात्रय ससाणे, मा.सौ.शैलजा खेडेकर, मा.सुनिल झगडे, मा.विष्णू हरिहर, मा.सुनिल गोगले, मा. शैलेश चरवड यांची दि. १४/५/१० ची उपसूचना.

६) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. २४, दि.१४/५/२०१०.

७) मा.राजेंद्र गोरडे यांचे दि. २८/५/२०१० चे पत्र.

८) मा.सुभाष जगताप व मा. दत्तात्रय ससाणे यांची दि. ११/६/२०१० ची उपसूचना.

९) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ३९, दि.११/६/२०१०.

---

मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्र अवलोकन केले व शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेऊन –

संदर्भ क्र. १ चे पत्रान्वये ना विकास विभागात पेट्रोल पंप/गॅस फिलींग स्टेशन अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करणेबाबत निदेश दिलेले आहेत. महानगरपालिकेच्या विकसित भागात पेट्रोल पंप/ गॅस फिलींग स्टेशन यांचा वापर अनुज्ञेय करणे धोकादायक होऊ शकते. यास्तव पेट्रोल/ गॅस फिलींग स्टेशन यांचा वापर ना विकास विभागात अनुज्ञेय करणे योग्य होईल असे नमुद केलेले आहे.

पुणे महानगरपालिकेच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावली मध्ये ना विकास विभागात पेट्रोल पंप / गॅस फिलींग स्टेशन उभारण्याबाबतची तरतुद समाविष्ट नाही. विकास नियंत्रण नियमावलीत ना विकास विभागात पेट्रोल/ गॅस फिलींग स्टेशन यांचा वापर अनुज्ञेय करण्याबाबतची तरतुद समाविष्ट करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करणेबाबत या निदेशानुसार विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १३.४.३.४ नव्याने नियम समाविष्ट करणे आवश्यक आहे.

संदर्भ क्र. २ अन्वये मा. शहर सुधारणा समिती व संदर्भ क्र. ३ अन्वये मा. मुख्य सभा यांनी विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १३.४.३.४ नुसार शेती विभागामध्ये पेट्रोल/ गॅस फिलींग स्टेशन खालील अटीवर अनुज्ञेय केले जातील असा ठराव केला आहे.

**अट क्रं.१ :–** प्रस्तावित भूखंडाचे क्षेत्रफळ किमान २००० चौ.मी. असावे. रस्त्याकडील बाजूस प्लॉटची रुंदी कमीत कमी ३० मी. असावी.

**अट क्रं.२ :–** या भूखंडावर कमाल ०.०४ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहील.

**अट क्रं.३ :–** या भूखंडावर फक्त तळमजल्याचे बांधकाम अनुज्ञेय राहील.तसेच या प्लॉटवर पेट्रोल पंप / गॅस फिलिंग स्टेशन या व्यतिरीक्त सेवा सुविधा साठी लागणारे बांधकाम अनुज्ञेय राहील तसेच स्वच्छतागृह चटई क्षेत्र मुक्त राहील.

**अट क्रं.४ :–** प्रस्तावित भूखंड राष्ट्रीय महामार्ग,राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग व किमान १८ मी रुंद रस्त्यावर असावा.

**अट क्रं.५ :–** केंद्र शासनाच्या पेट्रॉलियम विभागाचे तसेच चिफ कंट्रोलर ऑफ एक्सप्लोसिव्ह यांचे संमतीपत्र आवश्यक आहे.

**अट क्रं.६ :–** प्रचलित नियमानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच अन्य संबंधित विभागाकडे ना हरकत प्रमाण पत्र आवश्यक राहील तसेच सेवा रस्ता/इमारत रेषा नियंत्रण रेषा इ. बाबतीत शासन नियंत्रण सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं. आर. बी. डी. १०८१/८७१/रस्ते–७, दिनांक ९/३/२००१ व त्यानंतरची संदर्भातील वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके बंधनकार राहतील.

**अट क्रं.७ :–** केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट ॲण्ड हायवेज् कडील दि.२५ सप्टेंबर २००३/दि.१७ ऑक्टोंबर २००३ चे पत्र व त्यासोबतच्या सहपत्रातील सुचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

D.C.Rule.13.4.3.4.

Petrol pump / gas filling station may be permitted in non development zone provided that .

1. Minimum area of plot shall be 2000 sq mt. with minimum road side frontage of 30 mt.
2. Maximum permissible F.S.I. shall be 0.04 of the plot.
3. Only ground floor structure shall be permitted . structure for allied uses other than Petrol pump / gas filling station will be permitted and toilet block Will be permitted free of F.S.I.
4. Proposed plot shall be fronting on National high way State high way Major district road and minimum 18 m. wide road
5. N.O.C. of petroleum ministry, central government and chief controller of explosive shall be obtained .
6. N.O.C. of P.W.D. and other concern department shall be obtained. as per P.W.D. circular no. R.B.D. /1081/871/ roads dated 9/3/2001 and other concern circular regarding service road , building line & control line shall be binding .
7. Circular of Ministry of road transport and highway , central government department dt. 25 th September 2003/17 th October 2003 should be applicable for the permission .

स.क्र. ३ अन्वयेच्या मा. मुख्य सभा ठरावानुसार मराठी वृत्तपत्र दैनिक लोकमत, इंग्रजी वृत्तपत्र सकाळ टाईम्स मध्ये दि. १८/०९/२००८ रोजी जाहीर प्रकटन दिलेले होते. त्यास अनुसरुन श्री. अनिल जगन्नाथ शिंदे यांनी हरकत नोंदविलेली होती. दि. ०८/१२/२००८ रोजी हरकतदार श्री. अनिल जगन्नाथ शिंदे तसेच श्री. विश्वास कुलकर्णी, व्हाईस प्रेसिडेंट, आर्किटेक्ट, इंजिनिअर, सर्व्हेअर असोसिएशन श्री. सतिश मगर, व्हाईस प्रेसिडेंट, प्रमोटर ॲण्ड बिल्डर असोसिएशन यांना सुनावणी देण्यात आली होती. श्री. सुभोजित सरकार, क्लस्टर मॅनेजर, महाराष्ट्र शेल इंडिया मार्केटिंग प्रा. लि. सुनावणी वेळी उपस्थित नव्हते. यापूर्वी दिलेल्या जाहीर प्रकटनांमध्ये अट क्र. १ व ३ मध्ये काही माहिती नजर चुकीने नमुद करणे राहुन गेल्याने दि. १७/०९/२००९ रोजी दैनिक लोकमत या मराठी वृत्तपत्रामध्ये तसेच सकाळ टाईम्स या इंग्रजी वृत्तपत्रामध्ये, तसेच मे. शासन राजपत्रात दि. १०/०९/२००९ रोजी शुध्दिपत्रक देण्यात आले होते.

त्यास अनुसरुन हरकतदार श्री. अनिल शिंदे यांनी हरकत नोंदविली असून त्यांना दि. ०४/१२/२००९ रोजी सुनावणी देण्यात आलेली आहे. मा. महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबत सुनावणी तक्ता जोडला आहे.

एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६चे कलम ३७(१) अन्वये गौण फेरफाराची कार्यवाही पूर्ण झाली असल्याने प्रकरणी मे. शासनाचे अंतिम आदेश मिळणेबाबत मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

तसेच संदर्भ क्रमांक ८ चे उपसूचनेनुसार –

पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये हरीतपट्टा, शेती विभागासह ना विकास व डोंगरमाथा डोंगर उतारावर पेट्रोल /गॅस फिलींग स्टेशन अनुज्ञेय करण्यात यावा तसेच अट क्र.१ मध्ये प्रस्तावित भुखंडाचे क्षेत्रफळ किमान १००० चौ.मी.असावे.

( टिप – शहर सुधारणा समिती ठ.क्र. २४, दि.१४/५/२०१० चा निरस्त करणेत येत आहे. )

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. २०४, दि. २५/८/२०१० चा झाला आहे.)

## मा. महापालिका आयुक्त यांची पत्रे

**विषय क्रं. २८३**

पुणे मनपा प्रशासनाकडे '' उपायुक्त'' या पदावर महाराष्ट्र शासनाकडील श्री. हेमंत निकम यांची महाराष्ट्र शासन आदेश क्र. पीएमसी२००९/प्र.क्र.३२६/०९/नवि–२२, दि. ४/७/२००९ रोजी प्रतिनियुक्ती करण्यात आल्याचे व त्यांना दिनांक १/८/२००९ रोजी कार्यालयीन वेळेपूर्वी रुजू करुन घेऊन त्यांचेकडे उपायुक्त (विभागीय कार्यालय क्र. ४) या पदाचे संपूर्ण कामकाज सोपविण्यात आल्याबाबत मा. महा. आयुक्त यांचे जावक क्र. मआ/उआ/सेवि/२४०, दि. ४/८/२००९ चे पत्र.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. १८४, दि. २३/८/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्रं. २८४**

शिक्षण मंडळ गणवेष खरेदी सन २००९ –२०१० श्री. सुधाकर तांबे तत्कालीन प्रभारी शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ सध्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक व तांत्रिक शिक्षण) व शिक्षण मंडळ, पुणे मनपा यांचेवरील कारवाईबाबत मा. महापालिका आयुक्त यांनी जावक क्र. मआ/शिक्षण मंडळ/६५५, दिनांक २३/१२/२००९ ने पाठविलेला अहवाल.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. १३४, दि. २३/८/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्रं. २८५**

पुणे मनपा प्रशासनाकडे '' उप आयुक्त'' या पदावर महाराष्ट्र शासनाकडील श्री. मधुकांत गरड यांची महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पीएमसी – ३००९/मुमंस–६६१/प्र.क्र.४६४/०९/नवि–२२, मंत्रालय, मुंबई ३२, दि. ६/५/२०१० नुसार प्रतिनियुक्ती करण्यात आल्याचे व त्यांना दिनांक ११/५/२०१० रोजी कार्यालयीन वेळेपूर्वी रुजू करुन घेऊन त्यांचेकडे उपायुक्त (विभागीय कार्यालय क्र. ४) या पदाचे संपूर्ण कामकाज सोपविण्यात आल्याबाबत मा. महा. आयुक्त यांचे जावक क्र.मआ/उआ/से/१५४, दि.१६/६/२०१० चे पत्र.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. २०८, दि. २५/८/२०१० चा झाला आहे.)

**विषय क्र. २८६**

पुणे मनपा प्रशासनाकडे लेखाधिकारी या पदावर महाराष्ट्र शासनाकडील श्री. गायकवाड बाळकृष्ण रामचंद्र यांची महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पी.एम.सी.संलेको/२०१० प्र.क्र.६८/कोषा प्र.–२ मंत्रालय मुंबई यांचे दिनांक ३१/५/२०१० चे पत्रानुसार प्रतिनियुक्ती करण्यात आल्याचे व त्यांना दि. २५/६/२०१० रोजी मध्यान्हपूर्व रुजू करुन घेवून त्यांचेकडे अति. नगर अभियंता कार्यालयाकडील लेखाधिकारी (प्रत्यक्ष कामास मुख्य लेखापाल कार्यालय) या पदाचा संपूर्ण पदभार सोपविण्यात आलेल्याबाबत महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/उआ/से/३१९, दि.२७/८/२०१० चे पत्र.

**विषय क्र. २८७**

पुणे मनपा प्रशासनाकडे लेखाधिकारी या पदावर महाराष्ट्र शासनाकडील श्रीमती अभ्यंकर वैशाली विजय यांची महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पी.एम.सी.संलेको/२०१० प्र.क्र.६८/कोषा प्र.–२ मंत्रालय मुंबई यांचे दिनांक ३१/५/२०१० चे पत्रानुसार प्रतिनियुक्ती करण्यात आल्याचे व त्यांना दि. १६/६/२०१० रोजी

कार्यालयीन वेळेपूर्वी रुजू करुन घेवून त्यांचेकडे मुख्य लेखापाल कार्यालयाकडील लेखाधिकारी या पदाचा संपूर्ण पदभार सोपविण्यात आलेल्याबाबत महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/उआ/से/३२०, दि.२७/८/२०१० चे पत्र.

**विषय क्र. २८८**

पुणे मनपा प्रशासनाकडे लेखाधिकारी या पदावर महाराष्ट्र शासनाकडील श्री. खामकर जयसिंग रघूनाथ यांची महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पी.एम.सी.संलेको/२०१० प्र.क्र.६८/कोषा प्र.–२ मंत्रालय मुंबई यांचे दिनांक ३१/५/२०१० चे पत्रानुसार प्रतिनियुक्ती करण्यात आल्याचे व त्यांना दि. ३/७/२०१० रोजी कार्यालयीन वेळेपूर्वी रुजू करुन घेवून त्यांचेकडे अति. नगर अभियंता कार्यालयाकडील लेखाधिकारी पदाची संपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आलेलेबाबत महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/उआ/से/३२१, दि.२७/८/२०१० चे पत्र.

## मा. सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. २८९**

संदर्भ :– **मा. उज्वल केसकर व मा. बाबु वागसकर यांची (सूचना दि. १७/५/२०१०.)**

१) परिवहन उपक्रमाचे विषयपत्र क्रं.पीएमटी/टीसी/१७८१,दि.२६/६/२००३
२) मा.परिवहन उपक्रम समिती ठराव क्र१६१,दि.२४/७/२००३
३) परिवहन उपक्रमाचे विषयपत्र क्रं.पीएमटी/टीसी/२१९३,दि.१०/८/२००४
४) मा.परिवहन उपक्रम समिती ठराव क्र.२५३,दि.२५/११/२००४
५) मा.स्थायी समिती ठराव क्रं.१०२१,दि.१५/१२/२००४
६) मा.मुख्य सभा,मनपा पुणे ठराव क्र.२५०,दिनांक २२/१२/२००४
७) शासन निर्णय क्रं.पीएमसी/३०२००३/१४९०/प्र.क्र.१२४/०३ नवि–२२ नगरविकास विभाग,दि.१६/१२/२००४
८) शासन गठीत समितीच्या अहवालाचे पत्र क्रं.पीसीएमसी/टीसी/१५४/२००५, दि.६/६/२००५
९) शासन निर्णय क्रं.पीएमसी/३०२००३/१४९०/प्र.क्र.१२४/०३ नवि–२२ नगरविकास विभाग,दि.२/१/२००६
१०) शासन निर्णय क्रं.पीएमसी/३००३/१४९०/प्र.क्र.१२४/नवि–२२,दि.१३/४/२००६
११) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्रं.मआ–पीएमटी–२०६,दि.१९/५/२००६ चे पत्र.
१२) मा. सौ. राजलक्ष्मी भोसले, पक्षनेत्या, राष्ट्रवादी कॉंग्रेस ,मा. रमेश बोडके, पक्षनेता, शिवसेना, मा. अनिल शिरोळे, विरोधी पक्षनेता,यांची दि.२१/७/२००६ ची उपसूचना.

विषय :– पुणे परिवहन उपक्रम व पिंपरी–चिंचवड परिवहन उपक्रम यांचे एकत्रिकरणास मान्यता मिळणेबाबत.

–––

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे मनपा परिवहन उपक्रम व पिंपरी–चिंचवड परिवहन उपक्रम यांचे एकत्रिकरणास तसेच शासनाने नेमलेल्या संचालक मंडळाने दि.१६/१२/२००४ अन्वये गठित झालेल्या समितीने त्यांचे अहवालात केलेल्या शिफारशी नुसार खालील अटीवर मान्यता देण्यांत येत आहे.

१) शासनाने सूचित केल्याप्रमाणे इंडियन कंपनीज ॲक्टच्या तरतूदींखाली दोन्ही परिवहन उपक्रमाचे विलिनिकरण करुन नवीन कंपनी स्थापन करण्यास दोन्ही महापालिकाच्या भाग भांडवालच्या प्रमाणात समितीवर प्रतिनिधीचे प्रतिनिधित्व असावे.

२) परिवहन उपक्रम पुणे व परिवहन उपक्रम पिंपरी–चिंचवड यांच्या सध्या ताब्यात, वहिवाटीत किंवा त्यांचे नांवे असलेल्या सर्व मिळकती,स्थावर व जंगम मालमत्ता या निर्माण होणाऱ्या कंपनीमध्ये विलीन करणे आवश्यक राहणार आहे. त्याचप्रमाणे या दोन्ही परिवहन उपक्रमाचे त्यांचे –त्यांचे महानगरपालिका हद्दीत असलेल्या आरक्षणाच्या जागा ज्या दोन्ही संस्थांना अद्याप पर्यंत महानगरपालिकेच्या माध्यमातून संपादीत करुन प्राप्त झालेल्या नाहीत किंवा संपादनाची कार्यवाही प्रलंबीत आहे. अशा सर्व स्थावर मिळकती कंपनी निर्माण झाल्यावर देखील दोन्ही महानगरपालिकांनी सदरच्या आरक्षित स्थावर मिळकती उपलब्ध करुन देण्यास.

३) शासनाने आधीची देणी भाग विण्यासाठी वनटाईम ग्रॅन्ट द्यावी व विलीनिकरण झाल्यानंतर बजेट तयार करुन त्यात काही तोटा रहात असले तर त्यासाठी सुध्द ग्रॅन्ट द्यावी.

४) परिवहन उपक्रम पुणे हे पुणे शहरातील नागरिकांना महानगरपालिकेने निश्चित केलेल्या धोरणानुसार व

मान्यतेनुसार ज्या सवलती देत आहे, त्या सवलतीस अनुसरुन पुणे परिवहन उपक्रमास जो तोटा सहन करावा लागत आहे,तो तोटा पुणे महानगरपालिकेने सवलती दिलेल्या वर्षाच्या पुढील आर्थिक वर्षामध्ये द्यावयाचा आहे. या सवलती प्रामुख्याने:–

१) विद्यार्थ्यांना देण्यात येणारी ५०% प्रवास सवलत.

२) अंध व स्वातंत्र्यसैनिक यांना देण्यात येणारी १००% प्रवास सवलत

३) १० वी पर्यंत शिक्षण घेणारे अपंग विद्यार्थ्यांना १००% सवलत

४) पुणे शहरातील ज्येष्ठ नागरिकांना मासिक सवलतीच्या पासेसमध्ये देण्यात येणारी १००/– रुपयांची सवलत.

५) महानगरपालिकेकडील कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे वर्षभराचे संपूर्ण सवलतीचे पासेस.

वरीलप्रमाणे देण्यात येणाऱ्या सवलतींची होणारी रक्कम पुणे महानगरपालिकेने देणेआवश्यकआहे.

५) निर्माण होणाऱ्या कंपनीसाठी आवश्यक लागणारे भागभांडवल, त्याचप्रमाणे कंपनीचे आर्टिकल्स ऑफ असोसिएशन कंपनी कायद्याखाली रजिस्ट्रेशन करताना, त्यावर होणारी स्टॅम्प डयुटीचा खर्च महाराष्ट्र राज्य शासनाने माफ करावा व रजिस्ट्रेशन फी यांच्या सवलतीस शासनाने मान्यता न दिल्यास हा होणारा खर्च महानगरपालिकेने देण्यास.

६) विलिनीकरण झाल्यानंतर २ किंवा ३ वर्षानी कारभाराचा Review घेण्यासाठी समिती नेमावी व कारभाराचा अहवाल पाहून ठरवावे की पुणे मनपाने मदत द्यायची का नाही.

७) प्रत्येक प्रवाशांकडून तिकिटाद्वारे घेण्यात येणारा सरचार्ज पूर्व लक्षी प्रभावाने माफ (Amnesty) करावा.

८) कंपनीच्या मालमत्तांवर मनपाने (इतरांप्रमाणे ) मालमत्ताकर बसवावा.

९) पुणे मनपाची देणी वसूल करावीत.

१०) पी.सी.एम.सीचाही अशाच प्रकारे विचार व्हावा.

११) समितीमध्ये निवडून आलेल्या प्रतिनिधींनाच मतदानाचा अधिकार राहील, लोकप्रतिनिधींची संख्या वाढवावी.

१२) समितीमध्ये कामगार प्रतिनिधी घ्यावा, त्याला मतदानाचा अधिकार नसावा.

तसेच दोन्ही परिवहन उपक्रमांच्या विलिनिकरणाबाबत मान्यता देणेस व विलिनीकरणानंतर निर्माण होणाऱ्या कंपनीबाबत मा.महापालिका आयुक्त यांना मेमोरॅनडॅम ऑफ असोसिएशनस् त्याचप्रमाणे दाखल करावयाचे निरनिराळे कागदपत्रे/करार यावर स्वाक्षरी करण्यास व कंपनी कायद्याखाली विलिनिकरण करणेकामी महानगरपालिकेच्या वतीने सर्व अधिकार प्रदान करण्यास त्याचप्रमाणे वर नमूद केलेल्या सवलती व आर्थिक सहाय्य इ.देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सदर मनपा ठराव क्र.६३,दि. २१/७/२००६ चा फेरविचार करुन खालील प्रमाणे ठराव मान्य करण्यांत यावा.

संदर्भ :–
१) परिवहन उपक्रमाचे विषयपत्र क्रं.पीएमटी/टीसी/१७८१,दि.२६/६/२००३
२) मा.परिवहन उपक्रम समिती ठराव क्र१६१,दि.२४/७/२००३
३) परिवहन उपक्रमाचे विषयपत्र क्रं.पीएमटी/टीसी/२१९३,दि.१०/८/२००४
४) मा.परिवहन उपक्रम समिती ठराव क्र.२५३,दि.२५/११/२००४
५) मा.स्थायी समिती ठराव क्रं.१०२१,दि.१५/१२/२००४
६) मा.मुख्य सभा,मनपा पुणे ठराव क्र.२५०,दिनांक २२/१२/२००४
७) शासन निर्णय क्रं.पीएमसी/३०२००३/१४९०/प्र.क्र.१२४/०३ नवि–२२ नगरविकास विभाग, दि.१६/१२/२००४
८) शासन गठीत समितीच्या अहवालाचे पत्र क्रं.पीसीएमसी/टीसी/१५४/२००५, दि.६/६/२००५
९) शासन निर्णय क्रं.पीएमसी/३०२००३/१४९०/प्र.क्र.१२४/०३ नवि–२२ नगरविकास विभाग,दि.२/१/२००६
१०) शासन निर्णय क्रं.पीएमसी/३००३/१४९०/प्र.क्र.१२४/नवि–२२,दि.१३/४/२००६
११) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्रं.मआ–पीएमटी–२०६,दि.१९/५/२००६ चे पत्र.
१२) मा.सौ.राजलक्ष्मी भोसले, पक्षनेत्या, राष्ट्रवादी कॉंग्रेस ,मा.रमेश बोडके, पक्षनेता, शिवसेना, मा.अनिल शिरोळे, विरोधी पक्षनेता,यांची दि.२१/७/२००६ ची उपसूचना.

---

पुणे व पिंपपरी चिंचवड परिवन उपक्रम हे सातत्याने तोट्यात चात असल्याने व स्पर्धात्मक बस वाहतूक होत असल्याने प्रवाशांना आवश्यक अशी बससेवा उपलब्ध होत नव्हती. तसेच निर्णय प्रक्रिया होण्यास महानगरपालिकेवर अवलंबून रहावे लागत असल्याने ही दिरंगाई दूर करण्यासाठी पी.एम.टी.व पी.सी.एम.टी. एकत्रिकरणाचा निर्णय घेण्यात आला होता.

दोन्ही उपक्रमांचे एकत्रिकरण शासन निर्णय दि. १९.४.२००७ अन्वये झालेले आहे. आज तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील निर्माण झालेली कंपनी कुठल्याही प्रकारचा सक्षम कारभार करु शकलेली नाही. चांगली सेवा देऊ शकलेली नाही. याबाबत खालील मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे.

१. कंपनी निर्माण होऊन देखील आवश्यक तेवढ्या बसेस या ३ ते ४ वर्षामध्ये उपलब्ध करण्यास असमर्थ ठरलेली आहे.
२. दोन्ही संस्था एकत्रित होऊन देखील कंपनीची आर्थिक तूट कमी होण्याऐवजी वाढत चाललेली आहे. ही आर्थिक तूट केवळ दोन्ही महानगरपालिका शासन निर्णयास अनुसरुन आर्थिक अनुदान देत असल्याने कंपनी आर्थिक अडचणीतून मार्ग काढत आहे.
३. दोन्ही शहरातील प्रवाशांसाठी आवश्यक अशा मार्गाचे नियोजन व बसेसची उपलब्धता झाली नसल्याने सर्वसामान्य प्रवासी एकत्रिकरणाच्या निर्णयावर समाधानी नाहीत. कंपनी बस मार्ग व त्याचे नियोजन करण्यामध्ये असमर्थ ठरल्याचे दिसून येते.
४. आर्थिकदृष्ट्या दुर्बल होत चालेल्या संस्थेने अद्यापर्यत कंपनीचे सेवकवर्गाची आस्थापना म्हणजेच सेवक संख्येचे प्रमाण तयार केलेले नाही. सध्या असलेल्या दोन्ही उपक्रमांचे आस्थापनेनुसारच सेवकांची पदे अस्तित्वात आहे. म्हणजेच कंपनी होऊन देखिल दोन्ही उपक्रमाची आस्थापना/पदे आज रोजी अस्तित्वात आलेली नाहीत. याठिकाणी देखिल कंपनी असमर्थ ठरलेली आहे.
५. सेवकवर्गावरील द्यावयाच्या कायदेशीर वेतन रकमा मोठ्या प्रमाणात थकलेल्या आहेत. तसेच निवृत्त सेवकांचे तोषदान इ. गेल्या दोन वर्षापासून दिलेले नाही. त्यामुळे सेवकांच्या वेतनाच्या रकमा मोठ्या प्रमाणात थकत चाललेल्या आहेत.
६. एकत्रिकरणाच्या पार्श्वभूमीवर २००६ पासून कोणत्याही कर्मचाऱ्यांना बढती, प्रमोशन अनुषंगीक लाभ दिलेले नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी दिसून येत आहे. तसेच बढती, प्रमोशन न मिळताच सेवक निवृत्त होत आहेत. त्यामुळे त्यांना आर्थिक फायदा मिळालेला नाही. ही गंभीर बाब असून असमाधानी असलेले कर्मचारी कोणत्याही सहकार्याची भूमिका सध्या कामकाजात घेत नाहीत. कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष आहे.
७. कंपनी निर्माण झालेपासून कंपनीने प्रवासी कर व बालसंगोपन अधिभार इ. कोणतेही कर जे शासनाचे नियमानुसार भरणे आवश्यक होते ते आजपर्यत भरलेले नाहीत व त्यामुळे या कराची थकबाकी जवळजवळ १०० कोटीपेक्षा जास्त झाली आहे. कंपनी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली नसल्याने थकबाकी वाढत चाललेली आहे.
८. कंपनी निर्माण करताना नवीन कायद्यास अनुसरुन निरनिराळ्या करांची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येते व त्यामुळे कंपनीस नवीन आर्थिक बोजा कंपनी कायद्यातील तरतूदीनुसार लागू झालेला आहे. त्यामुळे कंपनी निर्माण होऊन देखील आर्थिक कराचे दायित्व निर्माण झालेले आहे व हे देखील आर्थिक दायित्व आर्थिक दुर्बलमुळे भरण्यात आलेले नाही.
९. कंपनी निर्माण झालेनंतर स्वबळावर डेपोंची उभारणी, बसताफा वाढविणे, कर्मचाऱ्यांवरील योग्य नियंत्रण, मार्गाचे पुर्ननियोजन, प्रवाशांचे संख्येमध्ये वाढ, शहरातील वाहतूक कोंडी सोडविणे, प्रदूषण पातळी कमी करणे इ. सर्व बाबींवर मात करण्यात कंपनी असमर्थ व निष्क्रीय ठरलेली आहे.
१०. कंपनी प्रस्तापित झालेपासून कंपनीचे कारभाराकरिता ७ अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक नियुक्त झालेले आहे. कोणीही वरिष्ठ अधिकारी दीर्घकाळ काम करुन इच्छित नाही. तसेच याठिकाणी कायम स्वरुपी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यास शासन देखील असमर्थ ठरलेले आहे. गेल्या ९ महिन्यापासून पूर्ववेळ व्यवस्थापकीय संचालक यांची नियुक्ती नसल्याने दैनंदिन कारभार ढासळत चाललेला आहे.
११. त्याचप्रमाणे कंपनी प्रस्तापित झालेपासून शासन निर्णयानुसार कंपनीचे संचालक मंडळामध्ये संचालक, वित्त संचालक, परिवहन उपक्रम व संचालक, मानव संसाधन यांच्या नेमणूका करण्यास देखील शासन/कंपनी असमर्थ ठरलेली आहे.
१२. शासन निर्णयानुसार आर्थिक दायित्व दोन्ही महानगरपालिकांवर माहे मार्च २०१० अखेरपर्यत आहे. हे आर्थिक दायित्व दोन्ही महानगरपालिकांकडून बंद केल्यावर ही कंपनी आर्थिक स्वबळावर दैनंदिन कारभार करु शकत नाही व कंपनीची दिवसेंदिवस परिस्थिती ढासळत चाललेली आहे. व याचा

परिणाम जनमानसावर वाहतूकीचा प्रश्न निर्माण होऊन अधिक गंभीर होईल.

कंपनी स्थापन करताना जो उद्देश ठेवण्यात आलेला होता, तो उद्देश सफल झालेला नसून पुणे व पिंपरी चिंचवड शहराला योग्य ते बसमार्ग, बससंख्या देता आलेली नाही. तसेच कंपनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकलेली नाही. थकित असलेले पूर्वीचे उपक्रमाचे थकित रकमेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते, कर्मचाऱ्यांची आस्थापना, बढती देखील प्रश्न सोडविण्यात आलेले नाही. सेवकांचे वेतनाच्या थकित रकमामध्ये वाढ झालेली आहे. कर्मचाऱ्यामध्ये असंतोष आहे. एकंदरीतच वाहतूक विषयक कोणतेही प्रश्न कंपनी प्रस्तापित झालेपासून सोडविल्याचे दिसून येत नाही सबब महानगरपालिका मुख्य सभा ठराव क्र.६३,दि.२१/७/२००६ चा फेरविचार करुन दोन्ही परिवहन उपक्रम दोन्ही महानगरपालिकांचे अधिपत्याखाली पूर्वीप्रमाणे अस्तित्वात आणणेस मान्यता देण्यात यावी.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. १८६, दि. २५/८/२०१० चा झाला आहे.)

<u>विषय क्र. २९०</u>

संदर्भ :– मा. दिलीप बराटे व मा. ज्ञानेश्वर शिंदे यांची (सूचना दि. २९/६/२०१०.)

–––

पुणे महानगरपालिका हद्दीबाहेरील आजू बाजूच्या ४० कि. मी. परिसरामध्ये पुणे महानगर नियोजन समितीची शासनाने स्थापना केली आहे. भविष्यामध्ये महानगरपालिकेच्या आजू बाजूची लोकसंख्या झपाट्याने वाढणार आहे. त्याचप्रमाणे नागरीकरण ही फार मोठ्या प्रमाणात होणार आहे. या नागरीकरणाचा विचार केल्यास येथील जमीन वापर, वाहतुक व्यवस्था, नैसर्गिक संसाधने याचा विचार करावा लागेल.

या करिता शासनाने त्वरीत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ( पी. एम. आर. डी. ए. ) ची स्थापना करावी. या कामी पुणे महानगरपालिकेने कार्यवाही करुन याबाबत राज्य शासनाकडे शिफारस करावी.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे ऑक्टोबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. २०९, दि. २५/८/२०१० चा झाला आहे.)

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
**शिवाजीनगर, पुणे ४११००५.**
**दिनांक :– २८/९/२०१०.**

**रमेश शेलार,**
**प्र.नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**